# मिनी दाल मिल यशोगाथा

# गावाचे नाव :— आपोती बु., ता.जि. अकोला

अकोला क्लस्टर मधील आपोती बु. या गावातील ७९७ लोकसंख्येपैकी एकुण १४० अल्प,अत्यल्प, भुमिहीन लाभार्थींची निवड कृषीसमृध्दी प्रकल्पासाठी करण्यात आली. हे गाव खारपाण पटटयामध्ये येते येथील लोकांचा मुख्य व्यवसाय शेती आहे. तुर एक प्रमुख पिक आहे. शिवाय खारपाण पटयामधील डाळीची वेगळी चव असुन हया भागातील डाळीला भरपुर मागणी आहे.

अकोला क्लस्टरमध्ये सर्व गावे खारपाण पटटयातील असुन तुरीचे उत्पादन जास्त आहे. तसेच अकोला क्लस्टर मधील एकाही गावामध्ये तुर दाल तयार करण्याची व्यवस्था नसुन त्याकरीता त्यांना अकोला शहरामध्ये यावे लागते या सर्व परिस्थितीचा विचार करून प्रकल्पातील सर्व गटांना मिनी दाल मिल विषयी माहिती व मार्गदर्शन करून प्रोत्साहीत करण्यात आले. संस्थेचे उपप्रकल्प व्यवस्थापक, व जिल्हा प्रकल्प व्यवस्थापन कक्ष अकोला चे पदाधिकारी यांनी गाव विकास समितीची सभा बोलावुन माहिती दिली. गाव विकास समितीने महात्मा फुले संयुक्त देयता समुहाची निवड केली. त्याकरीता त्याचे प्रशिक्षण तसेच क्षेत्र भेटीचे व्यवस्था प्रकल्पामधुन करण्यात आली.



आपोती बु. येथील महात्मा फुले संयुक्त देयता समुहाने सन २०१४ –१५ मध्ये प्रकल्पाच्या माध्यमातुन मिनी दाल मिल घेतली. पहिल्या वर्षी गटाला खुप अडचणी आल्या उदा. इलेक्ट्रीक ३ फेज कनेक्शन, कच्चा मालाचा पुरवठा, व काही तांत्रिक अडचणी. परंतु कृषीसमृध्दी प्रकल्पाच्या सहकार्यांने हळुहळु सर्वे अडचणीवर मात करून त्यांनी २४० क्विंटल दाल तयार केली तरीही ४०० ते ५०० रू. प्रति क्विंटल दराने एक लाख ते सव्वा लाख रू. गटाला उत्पन्न मिळाले. २०१५–१६ मध्ये इतर महिला गटामार्फत तुरीचे संकलन करून तसेच इतर शेतकऱ्यांना तयार करून तुर जमा करण्यात आली. एकंदरीत ५०० क्विंटल तुर दाल तयार करण्याची मजुरी खर्च वजा जाता दोन लाख रू. गटाला उत्पन्न मिळाले. एवढेच नाही तर दाल मिल गटाने स्वत:हा दोनशे क्विंटल तुर विकत घेवुन दाल तयार करून अकोला शहरात प्रति किलो १२० ते १४० रू. दराने विक्री केली.

गटाला मिनी दाल मिल तयार करण्याकरीता अनुदान सोडुन एक लाख चाळीस हजार रू. खर्च आला. आजरोजी खर्च वजा जाता गटाला २ ते २.५ लाख रू. निव्वळ नफा मिळाला. या गटाला मिळालेले उत्पन्न पाहता अकोला क्लस्टर मधील गोपालखेड या गावातील संघर्ष संयुक्त देयता समुहाने सुध्दा या वर्षी मिनी दाल उभारून उत्पन्नाचे नविन स्त्रोत निर्माण केला. आज रोजी दोन्ही मिनी दाल मिल व्यवस्थीत सुरू असुन दोन्ही गटातील सदस्यांचा आर्थिक स्थर उंचावण्यास मदत झाली. या दोन्ही गटाचा व्यवसाय पाहता इतरही गावातील गटांचा कल या व्यवसायाकडे वळत आहे.